**नियमीत दिवाणी दावा क्र.३२/२०२४**
**CNRNOMHOS120000632024**
**धनराज वि. सिंधुबाई व इतर**
**नि.क्र. २५ खालील आदेश**
**(आदेश दि.०६/१०/२०२५)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीच्या विरुध्द झालेला म्हणणे नाहीचा आदेश रद्यबातल होवुन कैफियत/म्हणणे दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रकरण वाटप होऊन मिळणेकरिता आहे. सदर वादी हा शेतामध्ये मजुरी करत असल्यामुळे त्यास न्यायालयात हजर होऊ शकले नसल्याने त्यांना हजर होऊन वेळेत म्हणणे/कैफियत दाखल करता आली नाही. सबब, प्रसतुत अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, अर्जातील कारण न्याय व योग्य नाही. वादीने अर्जात नमूद केलेली विधाने कायदेशीर नाहीत. वादी तारखेस नियमीत हजर आहे. अर्जाचे कारण संयुक्तीक नाही. वादीने खरी वस्तुस्थीती लपवुन ठेऊन खोटी व चुकीची माहिती दर्शवुन अर्ज दाखल केलेला आहे. वादीची प्रतिवादी क्र. १ ही पत्नी असून वादी प्रतिवादी क्र. १ ला सांभाळत नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ शी संगनमत करुन अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ला त्रास देण्याच्या हेतुने अर्ज दिलेला आहे. वादीने अर्जासोबत दिलेल्या शपथपत्रात खोटी व चुकीची माहिती दाखविलेली आहे. अर्जदाराला जास्तीत जास्त खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ ला देण्याच्या अटीवर आदेश होणे न्याय व योग्य आहे.

४. वादीच्या व प्रतिवादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन करता प्रस्तुत वादी विरुध्द दिनांक ०६.०८.२०२५ रोजी निशाणी क्र.२३ वर म्हणणे नाहीचा आदेश पारीत झाल्याचे

दिसून येते. प्रतिवादींनी त्याच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ वादीचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जात नमूद केलेले कारण जरी संयुक्तीक नसले तरी अर्जाच्या गुणदोषावर निकाल करण्याच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने रक्कम रुपये ४००/- इतकी कॉस्ट प्रतिवादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत वादीने सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2025.10.07 11:47:11 +0530

दिनांक – ०६.१०.२०२५

( राहुल द. डांगे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 06/10/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 06/10/2025 |
| Order uploaded on | --- | 07/10/2025 |